३८३८

# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ४०३/प्रनिप्रा/१० जुलै/२०२५/९०९ दिनांक : 25 JUL 2025

**:: १०५ व्या बैठकीचे इतिवृत्त ::**

**श्री. समीर कुमार बिस्वास, भा.प्र.से. (से.नि.), अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५ रोजी सकाळी ११:३० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **१०५ व्या बैठकीचे इतिवृत्त,-**

सदरील बैठकीची सुचना प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०६/२०२५ रोजीच्या बैठक सुचनेद्वारे सर्व सदस्यांना कळविण्यात आली होती. विषयसुचीनुसार संबंधीत कागदपत्रांचा संच दिनांक ०४/०७/२०२५ रोजी ई-मेलद्वारे पाठविण्यात आला.

सदरील बैठकीस श्री. दिलीप सरदेसाई (भा.प्र.से.), सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, २) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, ३) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. व ४) श्रीमती वर्षा मुंकुद लड्डा (उंटवाल), (भा.प्र.से.), सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे हे अनुपस्थित होते. याबाबत नोंद घेण्यात आली.

तसेच १) डॉ. वाय.सी. साळे, संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व २) श्री. महेंद्र कोठावदे, उपकुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे), ३) डॉ. संतोष गोविंदराव गिरबिडे, प्रतिनिधी, आयुष संचालनालय, मुंबई, ४) डॉ. किशोरकुमार प मडावी, प्रतिनिधी, आयुष संचालनालय, मुंबई व ५) डॉ. संदिप काळे, प्रतिनिधी, आयुष संचालनालय, मुंबई हे विशेष निमंत्रित उपस्थित होते.

हि बैठक कोरम (Quoram) अभावामुळे अर्धा तास तहकुब करुन त्याच ठिकाणी घेण्यात आली.

**विषय क्रमांक १ : प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२५ व २०/०६/२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत.**

प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२५ व २०/०६/२०२५ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त प्राधिकरणाच्या मान. सदस्य यांना दिनांक ३०/०६/२०२५ व ३/०७/२०२५ रोजीच्या पत्रासह पाठवून त्यांचे अभिप्राय देण्याबाबत कळविण्यात आले होते. या संदर्भात इतिवृत्ताच्या सुधारणेबाबत कोणतेही अभिप्राय /सुचना नसल्याने, सदरील बैठकीचे इतिवृत्त खालील सुधारणांसह मंजुर करण्यात आले. दिनांक २०/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक १ मधील तक्ता खालील प्रमाणे वाचण्यात यावा,-

| Sr. No. | Department | No. of Colleges considered in 104th Meeting on 20/6/2025 | Total Admitted Candidate w.r.t. Column No.3 | Decision of 104th Meeting, as per Directorate's Verification report (excluding OBC and SEBC category students) w.r.t. Column No.3 | | | Total No. of students admitted and pending for verfication | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | No. of Approved admissions | No. of Not Approved admissions | No. of cancelled admissions | OBC | SEBC |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) |
| 1 | Technical Education | 2534 | 289982 | 196449 | 848 | 343 | 74924 | 17418 |
| 2. | Higher Education | 832 | 63223 | 51523 | 765 | 20 | 10248 | 667 |
| 3. | AYUSH Education | 187 | 12467 | 6739 | 88 | 00 | 4209 | 1431 |
| 4. | Agriculture Education | 153 | 10377 | 6418 | 06 | 103 | 3304 | 546 |
| | **Total :** | **3706** | **376049** | **261129** | **1707** | **466** | **92685** | **20062** |

या अनुषंगाने वरील तालिकेतील नमूद प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी याबाबत कार्यवाही करावी.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक २ : प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२५ व २०/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.**

**बैठक दिनांक : ११/०६/२०२५**

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १. | - | प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२५ व २०/०६/२०२५ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त. | प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२५ व २०/०६/२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना दिनांक ३०/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आले होते. |

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| २. | ३ | सन २०२५-२६ साठी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे (सीईटी कक्षासह) अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक अवकनार्थ व मान्यतेकरिता सादर करणे.<br>**निर्णय / निर्देश :**<br>प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या कार्यालयांचे सादर करण्यात आलेल्या सन २०२५-२६ साठीचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाचे अवलोकन करण्यात आले. त्यावर सांगोपांग चर्चा करण्यात येऊन सदरचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक योग्य ते बदल करुन फेरसादर करण्याचे निर्देश देण्यात आले. | पुढील बैठकीत सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.<br>पुढील बैठकीत वार्षिक अंदाजपत्रक सादर करण्याचे प्राधिकरणाने निर्देश दिले. |
| ३. | ४ | सन २०२३-२४ पर्यंतचे लेखे विषयक Audit Report अवलोकनार्थ व मान्यतेकरिता सादर करणे.<br>**निर्णय / निर्देश :**<br>प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे सादर करण्यात आलेले सन २०२३-२४ पर्यंतचे अंतर्गत लेखा परीक्षण (Audit Report) अहवालाचे अवलोकन करण्यात आले. Audit Report मधील लेखा परीक्षकांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांनुसार व त्यांनी नोंदविलेल्या निरीक्षण/ मतानुसार मुद्देनिहाय अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश दिले. | पुढील बैठकीत सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.<br>पुढील बैठकीत लेखे विषयक Audit Report सादर करण्याचे प्राधिकरणाने निर्देश दिले. |
| ४. | ५ | सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियांसाठी तंत्रशिक्षण विभागातील प्रवेश पक्रियेसाठी अस्तित्वात असलेल्या Facilitation Center प्रमाणे इतर विभागातील प्रवेश प्रक्रियेसाठी विभागीय /जिल्हा / तालुका स्तरावर नव्याने Facilitation Center उभारण्याबाबत विचार विनिमय करणे. | प्राधिकरणाच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्याबाबत दिनांक २६/०६/२०२५ रोजीच्या |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | **निर्णय / निर्देश :**<br><br>तंत्रशिक्षण विभागातील प्रवेश प्रक्रियेसाठी अस्तित्वात असलेल्या Facilitation Center प्रमाणे इतर विभागातील प्रवेश प्रक्रियेसाठी विभागीय/जिल्हा/तालुका स्तरावर Facilitation Center उभारण्याबाबत एकमत झाले. Facilitation Center उभारण्यासाठीची प्राथमिक तयारी करण्यासाठी संबंधित विभागातील महाविद्यालयांकडून इच्छापत्र भरुन घेण्याचे निर्देश देण्यात आले.<br><br>राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून Facilitation Center साठी तयार करण्यात आलेल्या Important Instructions to Facilitation Center व The Role & Requirements of Facilitation Center प्रमाणे Facilitation Center साठी इच्छुक महाविद्यालयांकडून माहिती एकत्रित करुन, त्याचा अहवाल संबंधित संचालकांकडून प्राप्त करुन घेण्याचे निर्देश देण्यात आले.<br><br>उपरोक्त प्रमाणे तंत्रशिक्षण संचालनालय वगळून इतर संचालनालयांकडून Facilitation Center बाबतची माहिती घेण्यासाठी संचालकांना त्वरित कळविण्यात यावे. | पत्रान्वये संबंधित संचालकांना कळविण्यात आले आहे. संचालनालय स्तरावरुन या संबंधीची माहिती / प्रस्ताव अप्राप्त आहे. |
| ५. | ६ | अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी वेळापत्रक अवलोकनार्थ व मान्यतेकरिता सादर.<br><br>**निर्णय / निर्देश :**<br><br>या अनुषंगाने विषयांकित प्रकरणी सांगोपांग चर्चा करुन, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम ९ (५) मधील तरतूदी व शासनाच्या दिनांक ०८/०५/२०१७ रोजीच्या पत्राने कळविल्यानुसार, अधिनियमातील सुधारणा करण्यासंदर्भातील विधेयकास विधी मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर यथायोग्य पध्दतीने अधिसूचना मान्य होण्याच्या अधीन राहून वर नमूद प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव मान्य करण्याबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाने योग्य ती कार्यवाही करावी, या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्यासाठी अभ्यासक्रमांच्या प्रवेश बंद दिनांकानंतर प्राधिकरणाकडील प्रवेश मान्यतेची प्रक्रिया खालील दोन गटांत दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यास मान्यता देण्यात आली.<br><br>सदरचे वेळापत्रक सर्व संबंधित संचालक व संबंधित सर्व महाविद्यालये यांना कळविण्याचे निर्देश देण्यात आले. | शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे प्रवेश मान्यता प्रक्रियेचे वेळापत्रक सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ६. | ७ | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंतची प्रलंबित प्रकरणे फेरपडताळणी करुन प्राधिकरणाच्या निर्णयाकरिता सादर करणे (संदर्भ प्राधिकरणाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ९,१० व ११ मधील निर्देश.<br><br>**<u>निर्णय / निर्देश :</u>**<br>१. उपरोक्त तालिकेतील स्तंभ क्र. ४ (प्रपत्र-अ) मध्ये नमूद विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संचालकांच्या तपासणी अहवालानुसार व महाविद्यालयाने त्रुटीसंदर्भात सादर केलेल्या कागदपत्रानुसार प्रवेशांना मान्यता देण्यात येत आहे. प्रवेश मान्यतेबाबतचा निर्णय संबंधितांना कळविण्यात यावा.<br>२. तालिकेतील स्तंभ क्र. ५ (प्रपत्र-ब) मध्ये नमूद विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी महाविद्यालयाने कागदपत्रांच्या त्रुटींची पुर्तता विहित कालावधीमध्ये न केल्यामुळे संबंधित महाविद्यालयांना रुपये एक लाख दंड आकारुन प्रवेशांना मान्यता देण्यात येत आहे. महाविद्यालयांनी सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "६०२४९४८१३२१" (IFSC Code : MAHB०००३१०) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.<br>३. तालिकेतील स्तंभ क्र. ६ (प्रपत्र-क) मध्ये नमूद विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी महाविद्यालयांनी आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यामुळे सदर प्रवेशांना मान्यता नाकारण्यात येत आहे.<br>४. तालिकेतील स्तंभ क्र. ७ (प्रपत्र-ड) मध्ये नमूद विद्यार्थ्यांनी महाविद्यालय स्तरावर प्रवेश रद्द करण्यात आले आहेत.<br>तालिकेतील स्तंभ क्र. ९ मध्ये नमूद विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत प्राधान्याने मान्यतेसाठी सादर करण्यात यावे. | मान्यतेकरिता प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीत ३३८ प्रकरणांवर निर्णय घेण्यात आला आहे. प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना कळविण्यात आला आहे.<br><br>यापैंकी ०३ महाविद्यालयांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली, सदरील दंडाची रक्कम पत्र प्राप्त झाल्यापासून ०१ महिन्यात अदा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.<br><br>तसेच उर्वरित प्रकरणे तपासणी / छाननी करुन सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी प्राधिकरणास अवगत केले. उर्वरित प्रकरणे लवकरात लवकर पडताळणी करुन सादर करण्याचे निर्देश दिले. |
| ७. | ८ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे.<br><br>**<u>निर्णय / निर्देश :</u>**<br>याबाबत पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश दिले. | प्राधिकरणाच्या निर्णयानुसार दिनांक २०/०६/२०२५ रोजीच्या बैठकीत प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्यात आले आहे. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र रा[illegible]

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ८. | ९ | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ए.सी.पी.एम. चे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांच्या प्रवेश मान्यतेबाबत. (Discrepancy - Candidate was not registered with State CET Cell) - संदर्भ प्राधिकरणाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ३))<br><br>**<u>निर्णय / निर्देश :</u>**<br><br>.........विद्यार्थ्याने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेश घेतला आहे. त्यामुळे त्याचे शैक्षणिक हित लक्षात घेता, डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांचा प्रवेश मान्यतेचा निर्णय घेण्यात येत आहे. तथापि, महाविद्यालयाने प्रचलित प्रवेश नियम पद्धती डावलून हा प्रवेश दिला असल्याची बाब स्पष्ट आहे. महाविद्यालयाच्या या निष्काळजीपणाबाबत त्यांनी प्रथम वर्षात स्विकारलेल्या एकुण शुल्काच्या ५०% अर्थात रुपये १७ लाख एवढया रकमेचा दंड आकारुन, डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांचा प्रवेश मान्यतेचा निर्णय घेण्यात येत आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "६०२४९४८१३२१" (IFSC Code : MAHB०००००३१०) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे त्वरित भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील. सदर बाबत दंडाची पुर्तता केल्यानंतरच डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांच्या प्रवेश मान्यतेबाबतची पुढील कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. | प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीत रु. १७ लाख दंड आकारण्यात आलेला आहे व दंडाची पूर्तता पूर्ण झाल्यावर सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात यईल, असा निर्णय पारित करण्यात आला आहे. प्राधिकरणाच्या निर्णय संबंधित महाविद्यालयास दिनांक ३०/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आला आहे. महाविद्यालयाकडून दंडाची पूर्तता अद्याप करण्यात आलेली नाही |
| ९. | १० | कंधार कॉलेज ऑफ फार्मसी, नांदेड PH२५५९ या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र अशी त्रुटी असलेल्या कु. कुणाल मुंजाजी सोनटक्के या विद्यार्थ्याच्या प्रवेश मान्यतेबाबत.<br><br>**<u>निर्णय / निर्देश :</u>**<br><br>वरील बाबींवर सांगोपांग चर्चा करुन, सदर महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. कुणाल मुंजाजी सोनटक्के या विद्यार्थ्याच्या प्रवेशास मान्यता देण्यात येत आहे. | प्रवेश मान्यतेच्या निर्णयाबाबत संबंधितांना कळविण्यात आले आहे. |
| १०. | ११ | यादवराव तासगावकर अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्था, कर्जत DSE३१४७ या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमास जात वैधता प्रमाणपत्राची त्रुटी असलेल्या कु. आदित्य हेमंत सुतार या विद्यार्थ्याच्या प्रवेश मान्यतेबाबत. | प्रवेश मान्यतेच्या निर्णयाबाबत संबंधितांना कळविण्यात आले आहे. |

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | **निर्णय / निर्देश :**<br><br>......महाविद्यालयाच्या या निष्काळजीपणाबाबत रुपये १.० लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "६०२४९४८१३२१" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे निर्णय संबंधित व्यक्ती/संस्था यांना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.<br><br>विद्यार्थ्याचे पात्रता गुण - ८५.०३ लक्षात घेता व विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान लक्षात घेऊन, त्याच्या प्रवेशास उपरोक्त दंडाची रक्कम भरण्याच्या अधिन राहून प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. | सदरील दंडाची रक्कम पत्र प्राप्त झाल्यापासून ०१ महिन्यात अदा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. |
| ११. | १२ (क) | श्री. जयंत मोतीराम पाटील, विशेष कार्य अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांना ११ महिन्यांची मुदतवाढ देण्याबाबत.<br><br>**निर्णय:**<br><br>........राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील उच्च शिक्षण विभागातील सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया कामाचा व्याप लक्षात घेता, आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी दिनांक २८/०५/२०२५ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये श्री. जयंत मोतीराम पाटील यांच्या कंत्राटी पध्दतीवरील विशेष कार्य अधिकारी या पदावर दिनांक ०१/०६/२०२५ ते दिनांक ३०/०४/२०२६ पर्यंत ११ महिन्यांच्या कालावधीकरिता प्रति माह ठोक रु. ५०,०००/- इतक्या पारिश्रमिकावर मुदतवाढ देण्यात आली. यास प्रवेश नियामक प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता देण्यात आली. | मुदतवाढ देण्यात आली आहे. कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात आले आहे. |

**बैठक दिनांक : २०/०६/२०२५**

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक २०/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १. | १ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे.<br><br>**निर्णय / निर्देश :**<br><br>१) वरील विषयांत नमूद अभ्यासक्रमांपैकी वैद्यकीय शिक्षण व कला | याबाबत सर्व सेवापुरवठादारांची बैठक घेऊन प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार सर्व संचालकांना त्यांच्या लॉगिनमध्ये एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. संवर्गातील विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे पुन: पडताळणीसाठी |



अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक २०/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | शिक्षण विभागाअंतर्गत प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे अहवाल अद्याप ऑनलाईन पध्दतीने प्राधिकरणास प्राप्त झालेले नाही, याबाबत तपासणी/छाननी प्रक्रिया त्वरीत करुन अहवाल सादर करण्याबाबत संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई आणि संचालनालय, कला शिक्षण, मुंबई यांना निर्देश देण्यात आले.<br><br>२) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई येथील क्रमांक संकिर्ण-२०२४/प्र.क्र. ७५/आरक्षण-५, दिनांक २/०५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अधिकचा तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे, त्यानुसार सदरील कालावधी दिनांक १/०८/२०२५ रोजी पूर्ण होत आहे. या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची तपासणी व प्रवेश मान्यता प्रक्रिया खालील प्रमाणे करण्यात येईल,-<br>अ) या वाढवुन दिलेल्या कालावधीपर्यंत संबंधित विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र महाविद्यालयामार्फत संचालकांना तपासणी / छाननी दिनांक १६/०८/२०२५ रोजी पर्यंत सादर करणे बंधनकारक राहील.<br>ब) प्राप्त प्रमाणपत्रे संचालकांनी तपासणी / छाननी करुन त्यांचा वस्तूनिष्ठ अहवाल प्राधिकरणास मान्यतेसाठी दिनांक ३०/०८/२०२५ रोजी पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.<br><br>३) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. संवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांना शासनाच्या निर्देशानुसार जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ दिली असल्याने व सदर कागदपत्रांची संचालनालयामार्फत तपासणी / छाननी प्रक्रिया सुरु असल्याने, मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २०/०६/२०२५ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावातील एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. संवर्गाचे प्रवेशित विद्यार्थी वगळून उर्वरित प्रवेश मान्यतेस संचालनालयाच्या तपासणी/छाननी अहवालानुसार शिफारस केलेल्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. | उपलब्ध करुन देण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीत ठेवण्यात आलेल्या महाविद्यालयांची माहिती सर्व संचालकांना कळविण्यात आलेली आहे. दिनांक ५/०७/२०२५ रोजी पर्यंत उपरोक्त पडताळणी पूर्ण करण्याचे निर्देश दिनांक २६/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आले आहेत.<br><br>याशिवाय सदर पत्रामध्ये नव्याने कागदपत्रे सादर करण्याऱ्या विद्यार्थ्यांचा अहवाल सादर करण्याबाबतचे वेळापत्रक देण्यात आले आहे.<br><br>वरील निर्देशांच्या अनुषंगाने सेवापुरठादारांमार्फत योग्य ती कार्यवाही पुर्ण करण्यात आली असून. संचालनालय स्तरावर पडताळणी सुरु करण्यात आलेली आहे.<br><br>मान्यता देण्यात आलेल्या प्रवेशांना त्वरीत e-approval द्वारे कळविण्यात यावे.<br><br>अध्यक्ष<br>प्रवेश नियामक प्राधिकरण<br>महाराष्ट्र राज्य |

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक २०/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | याबाबतचा महाविद्यालय-निहाय तपशील **प्रपत्र-अ** मध्ये जोडण्यात आलेला आहे. महाविद्यालय-निहाय स्वतंत्र प्रवेश मान्यता पत्रे (e-approval letter) संबंधितांना प्राधिकरणाच्या पोर्टलद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावे.<br><br>४) तसेच या प्राप्त प्रस्तावांतील एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. संवर्गातील ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेली आहेत, अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश संचालकांनी पुनश्च तपासणी / छाननी करुन त्याचा वस्तूनिष्ठ अहवाल प्राधिकरणास सादर करावा. तसेच याबाबत पुनश्च पडताळणीसाठी ऑनलाईन पोर्टलमध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत सेवापुरवठादारास निर्देश दयावेत, असा ही निर्णय घेण्यात आला.<br><br>सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी प्राधिकरणाच्या उपरोक्त निर्णयानुसार कार्यवाही करावी. | |
| २. | २ | राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत NRI / OCI / PIO / FNS / CIWGC Admission Process Single Window System विकसित करण्यात येणाऱ्या पोर्टलद्वारे उमेदवारांना देण्यात येणाऱ्या सेवासाठी Eligibility Fees and One Time Processing Fees निश्चित करण्याबाबत.<br><br>**<u>निर्णय / निर्देश :</u>**<br><br>वेळेअभावी या विषयाबाबत विस्तृत चर्चा करता आली नाही. बैठकीत सादर केलेल्या प्रस्तावातील नमूद दरांची नोंद घेण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रवेश प्रक्रियेची तातडी लक्षात घेता सादर करण्यात आलेला दरांनुसार आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी पुढील योग्य ती कार्यवाही करावी व केलेली कार्यवाही विस्तृत टिप्पणीसह प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात यावी. | या संदर्भात वस्तूनिष्ठ अहवाल प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.<br><br>सदरील प्रकरण विषय क्रमांक ३ वर सादर करण्यात आले आहे. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

प्राधिकरणाच्या निर्णयानुसार / निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. उर्वरित प्रकरणी कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा.

**विषय क्रमांक ३ : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत NRI / OCI / PIO / FNS / CIWGC Admission Process Single Window System विकसित करण्यात येणाऱ्या पोर्टलद्वारे उमेदवारांना देण्यात येणाऱ्या सेवासाठी Eligibility Fees and One Time Processing Fees च्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत (प्राधिकरणाच्या दिनांक २०/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २).**

प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २०/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २ मधील निर्णयाचे अवलोकन करण्यात आले. सदर निर्णयानुसार आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधिल प्रवेशाची तातडी लक्षात घेऊन विषयांकित प्रकरणी केलेल्या कार्यवाहीबाबत खालील प्रमाणे विस्तृत माहिती सादर केली.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत NRI/OCI/PIO/FNS/CIWGC Admission Process Single Window System विकसित करण्यासाठी निविदा प्रक्रियेद्वारे निवडण्यात आलेल्या एडुलॅब एज्युकेशनल एक्सचेंज प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई या सेवापुरवठादार यांना दिनांक ३०/०५/२०२५ रोजी Letter of Intent (LOI) देण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये NRI/OCI/PIO/FNS/CIWGC Admission Process Single Window System या प्रस्तावित पोर्टलवर NRI/OCI/PIO/FNS/CIWGC उमेदवारांना देण्यात येणाऱ्या सेवा या मुंबई विदयापीठ व पुणे विदयापीठ यांच्याकडुन सद्यस्थितीत देण्यात येत असलेल्या बहुतांश सेवाप्रमाणे आहेत. या सर्व बाबीचा विचार करुन NRI/OCI/PIO/FNS/CIWGC उमेदवारांना प्रवेश प्रक्रियेशी संबंधीत खालील सेवा घेण्याबाबत निश्चित करण्यात आले.

- End to End software with server,
- Counselling and technical support,
- International call center and SMS charges,
- Marketing and branding,
- Post application support,
- VISA and consulate co-ordination,

उपरोक्त सेवा देण्यासाठी खालील दोन प्रकारचे दर मान्य करण्यात आले आहे,-

| | |
|---|---|
| Eligibility Fees- | USD ५० |
| One Time processing Fees | USD ११५० |
| Total : | USD १२०० |

सदर निश्चित करण्यात आलेल्या Eligibility Fees - USD ५० and One Time processing Fees - USD ११५० शुल्क, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या मान्यतेच्या अधिन राहून NRI/OCI/PIO/FNS/CIWGC उमेदवारांना नोंदणी करण्यासाठी तात्काळ उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे व त्यासाठी मे. एडयुलॅब यांना दिनांक २६/०६/२०२५ रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत. कार्यादेशात नमुद शुल्कास प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता देण्याची विनंती सादर केली. याबाबत संपूर्ण माहिती आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी सादर केली.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

<u>प्राधिकरणाचा निर्णय,-</u>

प्रस्तूत प्रकरणी सांगोपांग चर्चा करुन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला,-

१) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत NRI / OCI / PIO / FNS / CIWGC Admission Process Single Window System विकसित करण्यात येणाऱ्या पोर्टलद्वारे उमेदवारांना देण्यात येणाऱ्या सेवासाठी Eligibility Fees and One Time Processing Fees आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी निश्चित केलेल्या शुल्कास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. सदरील मान्यता ही प्रथमत: फक्त शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या एक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी असेल. मान्यता देण्यात आलेल्या शुल्काचा तपशील खालील प्रमाणे,-

| | |
|---|---|
| Eligibility Fees- | USD ५० |
| One Time processing Fees | USD ११५० |
| Total | USD १२०० |

२) आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी दिनांक २६/०६/२०२५ रोजीच्या कार्यादेशात नमुद केलेल्या टिपणी मध्ये a ते h मधील मुद्दयातील खालील मुद्दयांमध्ये सुधारणा करण्याचे निर्देश दिले,-

"a. For the Academic Year 2025-26, the fees per applicant - comprising of an eligibility fee of USD 50 and a one-time processing fee of USD 1,150 - amounts to USD 1,200, as accepted by the State CET Cell with the approval of the Admissions Regulating Authority. This fee is subject to revision for subsequent academic years to be determined by the State CET Cell, Maharashtra with the approval of the Admissions Regulating Authority.

f. M/s. Edulab Educational Exchange Private Ltd., Mumbai shall submit a detailed statement of expenses incurred under various heads on a monthly basis, before 7th of the next month along with the monthly progress report, commencing from the date of issuance of the Work-Order. Additionally, the agency shall provide an action plan outlining the marketing activities to be undertaken, and submit monthly report to the State CET Cell."

And also following point to be added,-

i. . M/s. Edulab Educational Exchange Private Ltd., Mumbai should take note that no data from the NRI portal will be shared with any other agency without the permission of the Admissions Regulatory Authority and the Commissioner & Competent Authority, State Common Entrance Examination Cell., Mumbai.

उपरोक्त सुधारणासह आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. या सुधारणाबाबत संबंधित सेवापुरवठादार यांना पत्राद्वारे कळविण्यात यावे. प्रस्तुत प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरण कार्यालयास सादर करावा.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**<u>विषय क्रमांक ४(अ) : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे.</u>**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी १) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, २) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे, ३) संचालक, आयुष शिक्षण संचालनालय, मुंबई व ४) संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या अखत्यारितीतील महाविद्यालय/अभ्यासक्रम निहाय प्राप्त झालेल्या प्रवेश तपासणी अहवालांचे अवलोकन करण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील संबंधित संचालनालयाद्वारे प्रमाणित होऊन प्राधिकरणास दिनांक ३०/०६/२०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या व प्राधिकरणाच्या दिनांक १०/०७/२०२५ रोजीच्या बैठकीत मान्यतेकरिता सादर करण्यात आलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांचा तपशील पुढील प्रमाणे आहे,-

| Sr. No. | Department | Total No. of Colleges | No. of colleges decided in previous meeting(s) | AAP to be considered in present (105th) Meeting | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | No. of colleges under consideration | Sanction Intake | No. of candidates Admitted | As per online portal (Excluding SEBC & OBC) as per Director's verification report w.r.t. column No. (7) | | | Total No. of Admissions to be kept pending | |
| | | | | | | | Recommended for approval | Not Recommended for approval | Admission Cancelled | SEBC | OBC |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) |
| 1. | Technical Education | 3940 | 2534 | 99 | 12846 | 7553 | 4516 | 36 | 00 | 190 | 2811 |
| 2. | Higher Education | 921 | 832 | 67 | 6270 | 5870 | 4694 | 177 | 01 | 102 | 896 |
| 3. | Agriculture Education | 248 | 153 | 01 | 40 | 22 | 19 | 00 | 00 | 00 | 03 |
| 4. | Medical Education | 487 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 |
| 5. | AYUSH Education | 234 | 187 | 43 | 2873 | 2866 | 1632 | 83 | 00 | 372 | 779 |
| 6. | Arts Education | 07 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 |
| | **Total :** | **5837** | **3706** | **210** | **22029** | **16311** | **10861** | **296** | **01** | **664** | **4489** |

या प्रस्तावांच्या अनुषंगाने पुढील मूद्द्यांवर सांगोपांग चर्चा करण्यात आली,-

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

१) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६ नुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक १७/१०/२०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार महाविद्यालयांनी प्रक्रिया शुल्काचा भरणा केलेला असुन प्रवेश मान्यता प्रस्तावासोबत त्याची पावती जोडलेली आहे.

२) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई येथील क्रमांक संकिर्ण-२०२४/प्र.क्र. ७५/आरक्षण-५, दिनांक २२/०७/२०२४, ७/०१/२०२५ व २/०५/२०२५, रोजीच्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास वेळोवेळी मुदतवाढ दिलेली आहे. दिनांक २/०५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयाने एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास तीन महिन्यांचा कालावधी वाढवुन देण्यात आलेला आहे. सदरचा कालावधी दिनांक १/०८/२०२५ रोजी पूर्ण होत आहे.

<u>प्राधिकरणाचा निर्णय.-</u>

१) वरील विषयांत नमूद अभ्यासक्रमांपैकी वैद्यकीय शिक्षण व कला शिक्षण विभागाअंतर्गत प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे अहवाल अद्याप ऑनलाईन पध्दतीने प्राधिकरणास प्राप्त झालेले नाहीत, याबाबत तपासणी/छाननी प्रक्रिया त्वरीत करुन अहवाल सादर करण्याबाबत संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई आणि संचालनालय, कला शिक्षण, मुंबई यांना निर्देश देण्यात आले.

२) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई येथील क्रमांक संकिर्ण-२०२४/प्र.क्र. ७५/आरक्षण-५, दिनांक २/०५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अधिकच्या गतीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे, त्यानुसार सदरील कालावधी दिनांक १/०८/२०२५ रोजी पूर्ण होत आहे. या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची तपासणी व प्रवेश मान्यता प्रक्रिया खालील प्रमाणे करण्यात येईल,-

अ) या वाढवुन दिलेल्या कालावधीपर्यंत संबंधित विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र महाविद्यालयामार्फत संचालकांना तपासणी / छाननी दिनांक १६/०८/२०२५ रोजी पर्यंत सादर करणे बंधनकारक राहील.

ब) प्राप्त प्रमाणपत्रे संचालकांनी तपासणी / छाननी करुन त्यांचा वस्तूनिष्ठ अहवाल प्राधिकरणास मान्यतेसाठी दिनांक ३०/०८/२०२५ रोजी पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

३) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. संवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांना शासनाच्या निर्देशानुसार जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ दिली असल्याने व सदर कागदपत्रांची संचालनालयामार्फत तपासणी / छाननी प्रक्रिया सुरु असल्याने, मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १०/०७/२०२५ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावातील एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. संवर्गाचे प्रवेशित विद्यार्थी वगळून उर्वरित प्रवेश मान्यतेस संचालनालयाच्या तपासणी/छाननी अहवालानुसार शिफारस केलेल्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. अभ्यासक्रम-निहाय तपशील खालील प्रमाणे,-

| Sr. No. | Department | No. of Colleges considered in the meeting | Total Admitted Candidate | Decision of present (105th) Meeting, as per Directorate Verification report (excluding OBC and SEBC category students) | | | Total No. of students admitted and pending for verfication | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | No. of Approved admissions | No. of Not Approved admissions | No. of cancelled admissions | SEBC | OBC |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) |
| 1 | Technical Education | 99 | 7553 | 4516 | 36 | 00 | 190 | 2811 |
| 2. | Higher Education | 67 | 5870 | 4694 | 177 | 01 | 102 | 896 |
| 3. | AYUSH Education | 43 | 2866 | 1632 | 83 | 00 | 372 | 779 |
| 4. | Agriculture Education | 01 | 22 | 19 | 00 | 00 | 00 | 03 |
| | **Total :** | **210** | **16311** | **10861** | **296** | **01** | **664** | **4489** |

याबाबतचा महाविद्यालय-निहाय तपशील <u>प्रपत्र-अ</u> मध्ये जोडण्यात आलेला आहे. सद्यस्थितीमध्ये महाविद्यालय-निहाय मान्यता प्रदान केलेल्या विद्यार्थ्यांची अद्ययावत यादी संबंधितांना प्राधिकरणाच्या पोर्टलद्वारे त्यांच्या Login मध्ये उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच संपूर्ण एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. संवर्गातील विद्यार्थ्यांची छाननी / पडताळणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर सर्व विद्यार्थ्यांची अभ्यासक्र/महाविद्यालय-निहाय अंतिम प्रवेश मान्यता पत्रे (e-approval letter) निर्गमित करावीत.

४) तसेच या प्राप्त प्रस्तावांतील एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. संवर्गातील ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेली आहेत, अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश संचालकांनी पुनश्च तपासणी / छाननी करुन त्याचा वस्तूनिष्ठ अहवाल प्राधिकरणास सादर करावा.

सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी प्राधिकरणाच्या उपरोक्त निर्णयानुसार कार्यवाही करावी.

**<u>विषय क्रमांक ४(ब)</u> : <u>प्राधिकरणाच्या दिनांक २०/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक १ मधील निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील ओ.बी.सी. व एस.ई.बी.सी. संवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.</u>**

अध्यक्ष प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य

प्राधिकरणाच्या दिनांक २०/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. संवर्गातील विद्यार्थ्यांची नव्याने सादर होणारी कागदपत्रे संचालकांनी तपासून त्याचा अहवाल दिनांक ३०/०८/२०२५ पर्यंत सादर करण्याबाबत संबंधीतांना कळविण्यात आलेले आहे.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २०/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार सदर बैठकीमध्ये मान्यतेसाठी सादर करण्यात आलेल्या महाविद्यालयांच्या प्रस्तावांमधील एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. संवर्गाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांनी आवश्यक प्रमाणपत्रे सादर केली आहेत किंवा कसे याची पुन:श्च पडताळणी करुन सर्व संचालकांनी पुन:पडताळणी अहवाल सादर करण्याबाबत प्राधिकरणाने निर्देश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने, प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर पडताळणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. संवर्गाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करुन अहवाल दिनांक ०५/०७/२०२५ रोजी पर्यंत निश्चितपणे सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक २६/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये संबंधीतांना कळविण्यात आलेले आहे.

प्राधिकरणाच्या दिनांक २०/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देशानुसार तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व आयुष शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. संवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांची पुनश्च तपासणी / छाननी करुन अहवाल ऑनलाईन पध्दतीने सादर केला आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. या विद्यार्थ्यांची दिनांक २०/०७/२०२५ रोजीच्या बैठकीत सादर केलेली, संचालकांनी तपासणी केलेली व तपासणी शिल्लक असलेल्या विद्यार्थ्यांची आकडेवारी पुढील प्रमाणे आहे,-

| Sr. No. | Department | Total number of admitted and pending for verification in the 104th meeting dated 20/06/2025 | | Verified by Directorate | | Pending for verification | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | SEBC | OBC | SEBC | OBC | SEBC | OBC |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| 1. | Technical Education | 17418 | 74924 | 9080 | 38779 | 8338 | 36145 |
| 2. | Higher Education | 667 | 10248 | 00 | 00 | 667 | 10248 |
| 3. | AYUSH Education | 1431 | 4209 | 1232 | 3824 | 199 | 385 |
| 4. | Agriculture Education | 546 | 3304 | 00 | 00 | 546 | 3304 |
| | **Total :** | **20062** | **92685** | **10312** | **42603** | **9750** | **50082** |

**प्राधिकरणाचा निर्णय,-**

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

संबंधित संचालकांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधी एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. संवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांची पुनश्च तपासणी / छाननी करुन सादर केलेल्या अहवालानुसार वरील तालिकेतील रकाना क्रमांक (५) व (६) मधील नमूद विद्यार्थ्यांना प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे. महाविद्यालय निहाय एस.ई.बी.सी. व ओ.बी.सी. संवर्गातील विद्यार्थ्यांची फेरपडताळणीनुसार मान्यता दिलेल्या विद्यार्थ्यांची माहिती सोबत <u>प्रपत्र - ब</u> मध्ये जोडली आहे.

तसेच संबंधित संचालकांनी उर्वरित विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रांची तपासणी / छाननी करुन अहवाल त्वरीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

<u>विषय क्रमांक ५</u>: **<u>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंतची प्रलंबित प्रकरणे फेरपडताळणी करुन प्राधिकरणाच्या निर्णयाकरिता सादर करणे (संदर्भ प्राधिकरणाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ९,१० व ११ मधील निर्देश.</u>**

आणि

<u>विषय क्रमांक ६</u> : **<u>माहे जानेवारी २०२५ पासून प्राप्त झालेल्या पुनर्विलोकन यांचिका प्रकरणी अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर.</u>**

आणि

<u>विषय क्रमांक ७</u> : **<u>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रथम वर्ष पदवी भौतिकोपचार अभ्यासक्रमास संस्थास्तरीय प्रवेश फेरीमध्ये प्रवेशित उमेदवारांच्या प्रवर्गामध्ये बदल करण्याबाबत.</u>**

आणि

<u>विषय क्रमांक ८</u> : **<u>उदय फिजीओथेरेपी मेडिकल कॉलेज, नागपुर येथील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रथम वर्ष पदवी भौतिकोपचार अभ्यासक्रमास संस्थास्तरीय प्रवेश फेरीमध्ये प्रवेशित उमेदवारांचे प्रवेश नियमित करण्याबाबत.</u>**

याबाबत पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश दिले.

<u>विषय क्रमांक ९</u>: **<u>मान. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>**

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र, मुंबई

(क) **<u>सीईटी कक्षाद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रक्रियांकरिता "विद्यार्थी सहाय्यता केंद्र" निर्मिती करण्याबाबत.</u>**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतदूंनुसार महाराष्ट्र राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा घेणे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश करण्याची प्रक्रिया प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत करण्यात येतात. सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया योग्य, पारदर्शी व गुणवत्तेवर आधारीत व शोषणरहीत पार पाडण्यासाठी या कार्यालयाकडून उपाययोजना करण्यात येतात. मागील काही वर्षातील सामाईक प्रवेश परीक्षा व प्रवेश प्रक्रियेची आकडेवारी सोबत जोडली आहे. या प्रक्रिया पार पाडत असताना खालील बाबींचा विचार करता काही समस्या उद्भवू नयेत म्हणुन "विद्यार्थी सहाय्यता केंद्राची" निर्मिती करणे गरजेचे वाटते.

१. दरवर्षी वाढत जाणारी विद्याथी संख्या

३६९



२. बदत जाणारी तसेच वाढत जाणारी अभ्यासक्रमांची / महाविद्यालयांची संख्या
३. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया संगणीकृत होत असल्याने राज्यातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाची गरज.
४. सामाईक प्रवेश परीक्षेची तसेच प्रवेश प्रक्रियेची माहिती नसलेल्या संगणक केंद्राकडून विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय व फसवणूक
५. राज्य भरातून प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडे विविध टप्प्यावर प्राप्त होणाऱ्या तक्रारींची संख्या आणि त्यासाठी विद्यार्थी व पालक यांना मुंबई येथील कार्यालयात यावे लागणे.
६. त्यासाठी त्यांना अतिरिक्त वेळ व पैसा खर्च करावा लागतो.
७. विविध अभ्यासक्रमात प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पालक / विद्यार्थी यांना माहिती नसणे.

या प्रकारच्या बाबींचा विचार करता महाराष्ट्र राज्यात जिल्हास्तरावर व आवश्यकतेनुसार तालुकास्तरावर "विद्यार्थी सहाय्यता केंद्राची" निर्मिती केल्यास विद्यार्थी व पालक यांना येणाऱ्या अडचणी कमी होऊन सामाईक प्रवेश परीक्षा घेणे व प्रवेश प्रक्रिया राबवणे यामध्ये दर्जात्मक सुधारणा होईल. सद्यस्थित तंत्रशिक्षण विभगाातील अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सुविधा केंद्रे उपलब्ध आहेत, त्याच धर्तीवर इतर अभ्यासक्रमातील प्रवेशासाठी सुविधा केंद्रे निर्माण करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आलेला आहे. याबाबत संबंधित संचालकांना दिनांक १३/०६/२०२५ व दिनांक २६/०६/२०२५ रोजीच्या पत्राने माहिती सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. याबाबत संचालकांनी अद्याप त्यांचा प्रस्ताव / माहिती सादर केलेली नाही.

वर उल्लेख केल्यानुसार महाराष्ट्र राज्यात जिल्हास्तरावर "विद्यार्थी सहाय्यता केंद्राची"प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे असतील,-

१. व्यावसायिक अभ्यासक्रमांबाबत विद्यार्थ्यांचे समुपदेशन (Counselling) करणे.
२. सामाईक प्रवेश परक्षिच्या प्रत्येक स्तरावर मार्गदर्शन करणे (उदा. सीईटी ची निवड करणे, नोंदणी करणे, परिक्षा केंद्र निवडणे, परीक्षा पध्दती, परिक्षा माध्यम, Percentile पध्दती)
३. प्रवेशासाठी अभ्यासक्रमनिहाय आवश्यक कागदपत्रांची माहिती देणे. हे काम वर्षभर चालू ठेवल्यास, विद्यार्थी/पालक यांना आवश्यक कागदपत्रांची वेळेत माहिती मिळेल व त्यांची आयत्यावेळी पळापळ / अडचण होणार नाही.
४. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची प्रत्येक स्तरावर माहिती देणे (उदा. नोंदणी करणे, पसंतिक्रम भरणे, प्रवेश निश्चिती करणे, प्रवेश शुल्काबाबत माहिती, इ.)
५. प्रत्यक्ष नोंदणी अर्ज भरणे (CET & CAP)
६. कागदपत्रे अपलोड करणे व प्रिंटआऊट उपलब्ध करुन देणे.
७. प्रत्यक्ष कागदपत्रांची तपासणी करणे.
८. विद्यार्थी सहाय्यता केंद्र थेट CET/ARA कार्यालयाशी संपर्कात असतील (Online Meeting)
९. तक्रारींची शहानिशा करतील.
१०. विद्यार्थी सहाय्यता केंद्र सद्या अस्तित्वात असलेल्या सामाईक प्रवेश परीक्षा व प्रवेश प्रक्रिया प्रणालीशी जोडलेली असतील.
११. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांची CET Cell/ ARA संबंधित कामे या केंद्राच्या मदतीने करता येतील.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या एकुण २० सामाईक प्रवेश परीक्षा व त्यासाठी अंदाजे १३.७० लाख विद्यार्थी नोंदणी करतात. एकुण ७३ अभ्याकक्रमांमध्ये ५९०० महाविद्यालयांत प्रवेशासाठी अंदाजे १२.७ लाख विद्यार्थी नोंदणी करतात व त्यातील अंदाजे ४-५ लाख विद्यार्थी प्रवेश घेतात, तसेच प्रवेश घेतलेल्या या ४-५ विद्यार्थ्यांची या ५९०० महाविद्यालयात देण्यात येणारी प्रवेश मान्यता प्रक्रिया, या सर्व प्रक्रियेसाठी संबंधित असलेला मुख्य घटक म्हणजे विद्यार्थी, तसेच महाविद्यालय यांना जिल्हास्तरावर विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर सर्व आवश्यक सेवा उपलब्ध असतील.

या केंद्रावर प्रवेश परीक्षा व प्रवेश प्रक्रिये दरम्यान अंदाजे कमीतकमी ४ लाख विद्यार्थी याचा लाभ घेतील. सद्यस्थितीत तंत्रशिक्षण विभागातील सुविधाकेंद्रांना प्रती विद्यार्थी रुपये ५० याप्रमाणे लाभ घेणाऱ्या अंदाजे २.९ लाख विद्यार्थ्यांच्यापोटी अंदाजे १४५ लाख रुपये राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून खर्च करण्यात येतात.

उपरोक्त बाबींवर सखोल चर्चा करण्यासाठी “विद्यार्थी सहाय्यता केंद्र” स्थापन करण्याच्या प्रस्तवांवर सखोल व सांगोपांग चर्चा करण्यात आली.

**<u>प्राधिकरणाचा निर्णय,-</u>**

आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी सादर केलेल्या वरील प्रस्तावाचे अवलोकन करुन सीईटी कक्षाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध प्रक्रियांकरिता “विद्यार्थी सहाय्यता केंद्राची” निर्मिती करण्यास प्राधिकरणाची तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी पुढील उचित कार्यवाही करावी व सविस्तर प्रस्ताव / प्रकल्प आराखडा प्राधिकरणास त्वरीत सादर करावा.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**(समीर कुमार बिस्वास, भा.प्र.से.(से.नि.))**
**अध्यक्ष,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य.**